**ठळक बातम्या**

- जीएसटी कर सुधारणांचं मान्यवरांकडून स्वागत/ उद्योग जगतानं व्यक्त केलं समाधान
- कोळशाच्या व्यवहारासाठी शेअर बाजाराच्या धर्तीवर वेगळा मंच सुरू होणार
- जेएनपीटीच्या टर्मिनल-टू चं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन

**आणि**

- आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताची आज मलेशियाशी लढत

**<><><><>**

जीएसटी कररचनेतल्या सुधारणांचं सर्व क्षेत्रातून स्वागत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या सुधारणांचं कौतुक केलं आहे. जीएसटीचे दर कमी करण्याच्या सरकारच्या या निर्णयामुळे सर्वांना फायदेशीर होणार आहे. जीवनमान सुलभ करण्यासाठी दरांचं सुसूत्रीकरण आणि सुधारणांसाठी एक सविस्तर प्रस्तावही तयार केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

जीएसटीमधला बदल जीवन सुलभ आणि व्यवसाय सुलभ करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांवर मोठा प्रभाव टाकेल. अशी प्रतिक्रिया परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी व्यक्त केली आहे. तर जीएसटीमधली सुधारणा हे एक परिवर्तनकारी पाऊल असून शेतकरी, एमएसएमई, महिला, तरुण, मध्यमवर्गीय या सर्वांनाच दिलासादायक असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे.

जीएसटी कररचनेतल्या सुधारणेमुळे देशातल्या प्रत्येक कुटुंबाला मदत होणार असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. तर, या सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले…..

- **- -होल्ड- बाईट- फडनवीस**. - - -

जीएसटी सुधारणेमुळे ग्राहकांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल तसंच खरेदी वाढेल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. या सुधारणांमुळे सर्वसामान्यांना दिलासा,

महागाईवर नियंत्रण आणि लहान उद्योगांना मजबुती असे अनेक उद्देश साध्य झाले आहेत, अशी प्रतिक्रिया केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री **रामदास आठवले** यांनी दिली आहे. जीएसटीमध्ये केलेल्या सुधारणांचं माजी केंद्रीय अर्थमंत्री **पी. चिदंबरम** यांनी स्वागत केलं आहे. जीएसटीमधल्या सुधारणा या आधीपासूनच लागू व्हायला हव्या होत्या, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. तर, काँग्रेस पक्ष दीर्घकाळपासून या सुसूत्रीकरणाची मागणी करत होता, असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलंय.

वस्तू आणि सेवा कर पुनर्रचनेचे जीएसटी परिषदेचे निर्णय सर्वसामान्यांना दिलासा देणारे असल्याचं महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

उद्योग आणि व्यवसाय जगतानं या सुधारणांचं स्वागत केलं आहे. जीएसटी सुधारणेतल्या कर्जाची परतफेड आणि एमएसएमईवरचे अनुक्रमे ५ टक्के आणि १८ टक्के करांमुळे व्यवसाय प्रक्रिया सुलभ होईल, अशी प्रतिक्रिया भारतीय उद्योग महासंघ सीआयआयनं दिली आहे. तर जीएसटी सुधारणा अप्रत्यक्ष कर रचना परिपक्व झाल्याचं दर्शवतात अशी प्रतिक्रिया फिक्की अर्थात फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनं दिली आहे. असोचेम चे मनीष सिंगल यांनी सांगितलं…

- **- होल्ड- बाईट- सिंगल** - -

या सुधारणा म्हणजे करव्यवस्थेतलं एक धाडसी पाऊल असून यामुळे मागणीला चालना मिळेल, तसंच संबंधित प्रक्रिया सोप्या होतील, अशी प्रतिक्रिया फिक्कीचे माजी अध्यक्ष शुभ्रकांत पांडा यांनी दिली आहे. लहान व्यापारी, ग्राहकांसह भारताच्या अर्थव्यवस्थेलाही फायदा होणार असल्याचं ऑल इंडिया ट्रेडर्स कॉन्फेडरेशनं म्हटलं आहे. इंडियन मर्चंट्स चेंबरनं या सुधारणांचं स्वागत केलं आहे.

सर्वसामान्यांनी या फेरबदलांबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. ऐकूया मुंबईतल्या दयानिधी विद्यालयातले शिक्षक मोहन वाघ यांची प्रतिक्रीया..

- **- होल्ड- बाईट- वाघ - -**

- **<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं ५६व्या बैठकीत वस्तू आणि सेवा कररचनेच्या सुसूत्रीकरणाला मान्यता देताना करांच्या दरात केलेल्या बदलांविषयी ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड -व्हॉईस कास्ट (तुषार)**

येत्या २२ तारखेपासून लागू होणार असलेल्या या सुधारणांविषयी आम्ही टप्प्याटप्प्यानं तपशीलवार माहिती देत राहू.

<><><><>

शेअर बाजाराच्या धर्तीवर कोळशाच्या व्यवहारासाठी वेगळा मंच सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी आज मुंबईत दिली. कोळसा मंत्रालयाच्या स्टार रेटिंग पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. या मंचाच्या स्थापनेला संसदेची मान्यता मिळाली आहे. या मंचाच्या माध्यमातून देशातल्या खरेदीदारांच्या गरजा पूर्ण केल्या जातील असं ते म्हणाले.

कोळसा क्षेत्रातल्या कंपन्यांनी नवनवतीन तंत्रज्ञान विकसित करावं, त्याचवेळी विविध घटकांना ध्यानात घेऊन काळजीपूर्वक खाणकाम करावं, असं आवाहन रेड्डी यांनी केलं. कोळसा नियंत्रकांच्या नव्या वेबसाईटचं अनावरणही त्यांनी केलं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांनी आज जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या टर्मिनल २ चं दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घघाटन केलं. यावेळी केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनो◌ेवाल, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बंदरे व नौवह चे राज्यमंत्री शांतनू ठाकूर उपस्थित होते.  ही गोदी पूर्णपणे सौरऊर्जेवर चालणारी असून विशेष मार्गिका असलेलं या पोर्टवरील पहिलं कंटेनर टर्मिनल आहे.

<><><><>

बिहारमधे राजगीर इथं सुरु असलेल्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत आज भारताचा सामना मलेशिया बरोबर होणार आहे. थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

कोरियासोबत काल झालेल्या सामन्यात भारतानं २-२ अशी बरोबरी साधली.

<><><><>

न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करायला केंद्रानं आज मंजुरी दिली. न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने २४ ऑगस्ट रोजी त्यांच्या नावाची शिफारस केली होती.

<><><><>

राज्यात गेल्या २४ तासात सिंधुदूर्ग, वाशीम, गडचिरोली, पालघर, नंदूरबार या जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस पडला. यवतमाळ जिल्ह्यात पूरात वाहून गेल्यानं एकाचा मृत्य झाला.

आज आणि उद्या रायगड, पुणे घाट, कोल्हापूर घाट आणि नंदूरबार, धुळे, नाशिक घाट आणि पालघर या जिल्ह्यांना ऑरेंज ॲलर्ट दिला आहे. तिथल्या जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असल्याचं राज्य शासनाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

//<><><><>//